# आपल्याला माहीत आहे का?

१) अभिमत विद्यापीठ म्हणजे काय?

➢ सर्वसामान्यपणे काही विद्यापीठे कायदा करून नंतर स्थापन केली जातात. उदा. पुणे विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ. परंतु काही विद्यापीठे अशी असतात, की ज्यांचे शैक्षणिक क्षेत्रातील कार्य उल्लेखनीय असल्याने त्यांना केंद्रशासनामार्फत विद्यापीठाचा दर्जा दिला जातो. टिळक महाराष्ट्र विद्यापीठाला हा दर्जा १९८७ साली बहाल करण्यात आला. अशा विद्यापीठांना अभिमत विद्यापीठ म्हटले जाते. उदा. भारती विद्यापीठ, डेक्कन कॉलेज, गोखले इन्स्टिट्यूट.

२) दूरशिक्षण पद्धती म्हणजे काय?

➢ दूरशिक्षण पद्धती ही नियमित (रेग्यूलर) व बहि:स्थ (एक्स्टर्नल) यातील सुवर्णमध्य आहे. नियमित पद्धतीतील तासांना बसण्यासारखी बंधने दूरशिक्षण पद्धतीत नसतात. बहि:स्थ पद्धतीत विद्यार्थी निराधार असतो. दूरशिक्षण पद्धती ही विद्यार्थीकेंद्रित असते. विद्यार्थ्यांच्या स्वयंअध्ययनाला मदत करण्यासाठी त्यांना वेगळ्या पद्धतीतील पुस्तके पुरविली जातात. विषयांचे काही मार्गदर्शनही दिले जाते. गृहपाठांच्या निमित्ताने विद्यार्थ्यांचा अभ्यासाशी संबंध राहील, याची काळजी घेतली जाते.

३) टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे विद्यापीठाचाच भाग आहे का?

➢ नाही. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ हे स्वतंत्र व स्वायत्त विद्यापीठ आहे.

४) टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या पदव्या इतर विद्यापीठांच्या पदव्यांशी समकक्ष आहेत का?

➢ होय, कारण -

१) टि. म. वि. च्या पदव्या या विद्यापीठ अुदान आयोगाने निर्देशित केल्यानुसार आहेत.

२) टि. म. वि. अन्य विद्यापीठांप्रमाणेच शासनमान्य आहे.

३) टि. म. वि. AIU (Association of Indian Universities) ची सदस्य असून, या संघटनेच्या सदस्य विद्यापीठांची एकमेकांच्या पदव्यांना मान्यता/समकक्षता असते.

५) टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या दूरशिक्षणांतर्गत चालविण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमांना मान्यता आहे का?

➢ होय टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या दूरशिक्षणांतर्गत चालविण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमांना युनिव्हर्सिटी ग्रँट कमिशनच्या डिस्टन्स एज्युकेशन ब्युरो या संस्थेची मान्यता आहे.

६) संपर्कसत्र म्हणजे काय?

➢ नोकरी, घरकाम सांभाळून उच्च शिक्षण पूर्ण करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासासंदर्भातील, प्रशासकीय कामासंदर्भातील शंका दूर कराव्यात. स्वत:च अभ्यास कसा करावा (स्वयंअध्ययन)? दूरशिक्षण पद्धतीत कोणत्या प्रकारचे साहाय्य विद्यार्थ्यांच्या सोयीनुसार मार्गदर्शनाचे तास आयोजित केले जातात. त्यालाच संपर्कसत्र म्हटले जाते. यातील मार्गदर्शनाचा विद्यार्थ्यांना खूप फायदा होतो, अशा विद्यार्थी प्रतिक्रिया आहेत.

७) स्वयंअध्ययन साहित्य म्हणजे काय?

➢ दूरशिक्षण पद्धतीत विद्यार्थी व शिक्षक यांच्या नियमित पद्धतीप्रमाणे रोजच्या रोज संबंध येत नाही. त्यामुळे स्वयंअध्ययनाला अतिशय महत्त्व आहे. स्वयंअध्ययन साहित्य म्हणजे स्वत:चा अभ्यास स्वत:च करताना मार्गदर्शक ठरतील, अशा रीतीने विशेष पद्धतीने लिहिलेली पुस्तके, विद्यार्थ्यांची मानसिकता, त्यांच्या अडचणी लक्षात घेऊन त्यांना समजतील अशा अत्यंत सोप्या भाषेत ही पुस्तके तयार केलेली असतात. त्या संदर्भातील आवश्यक ते प्रशिक्षण घेऊन प्राध्यापकांनी ही पुस्तके तयार केलेली असतात.

८) नियमित पदवी व दूरशिक्षण पद्धतीतील पदवी फरक असतो का?

➢ नियमित पदवी व दूरशिक्षण पद्धतीतील पदवी यांच्यामध्ये कार्यपद्धतीचा फरक असतो; मात्र या दोन्ही पदव्या एकसारख्या (समकक्ष) असतात.

९) पुढील शिक्षणासाठी, प्रमोशनसाठी, आर्थिक लाभांसाठी पदवी ग्राह्य धरली जाते का?

➢ निश्चितच आणि म्हणूनच विद्यापीठाच्या अभ्यासक्रमांना मागणी आहे.

१०) टिळक महाराष्ट्र विद्यापीठाची पदवी घेऊन UPSC/MPSC च्या परीक्षा देता येतात का?

➢ होय. यापूर्वी टि. म. वि. च्या अनेक विद्यार्थ्यांनी या प्रशासकीय सेवा परीक्षांमध्ये यश मिळविलेले आहे.

११) टिळक महाराष्ट्र विद्यापीठाची पदवी घेऊन उच्च शिक्षणासाठी परदेशात संधी उपलब्ध असतात का?

➢ अन्य कोणत्याही विद्यापीठाच्या पदव्यांप्रमाणे टि. म. वि. च्या पदव्या परदेशगमनासाठी ग्राह्य धरल्या जातात.

१२) फीमध्ये सवलत दिली जाते का?

➢ विद्यापीठात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या गरीब व होतकरू मुलांना दोन हप्त्यात फी भरण्याची सवलत देण्यात येते.

१३) प्रवेशपूर्व परीक्षा बारावी समकक्ष आहे का?

➢ प्रवेशपूर्व परीक्षा बारावी समकक्ष नाही.

१४) एका वर्षात पदवीधर होता येते का?

➢ टिळक महाराष्ट्र विद्यापीठात एका वर्षात पदवीधर होता येत नाही. अंतिम निकालासाठी शेवटच्या दोन वर्षांचे गुण विचारात घेतले जातात. त्यामुळे पदवीचे प्रथम वर्ष उत्तीर्ण असल्यास द्वितीय वर्षाला प्रवेश दिला जातो. अशा विद्यार्थ्यांना दोन वर्षांत पदवीधर होता येते.